# मिरा भाईंदर महानगरपालिका

## माहिती व जनसंपर्क विभाग

## प्रसिद्धीपत्रक

- **"घर घर संविधान" उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांचा हेरिटेज वॉक — संविधानाबाबत जागरूकतेसाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेचा अनोखा उपक्रम**

भारतीय संविधान अमृत महोत्सव २०२४-२५ अंतर्गत "घर घर संविधान" हा जनजागृतीपर उपक्रम मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद शर्मा (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वतीने प्रभावीपणे राबविला जात आहे. या उपक्रमाचा एक भाग म्हणून, बुधवार, दिनांक १६ एप्रिल २०२५ रोजी मनपा घोडबंदर शाळा ते घोडबंदर किल्ला विद्यार्थ्यांच्या सहभागातून "हेरिटेज वॉक" चे आयोजन करण्यात आले. या प्रेरणादायी उपक्रमात मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मनपा घोडबंदर शाळेच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या शिक्षकांसह घोडबंदर किल्ल्याची अभ्यासपूर्वक पाहणी केली आणि या ऐतिहासिक वारसाचे महत्त्व समजून घेतले. किल्ल्याचा परिसर, बुरुज, रचना, तसेच "घोडबंदर" हे नाव कसे पडले यासंदर्भातील रोचक माहिती विद्यार्थ्यांना सांगण्यात आली. त्यानंतर, भारतीय संविधान व घोडबंदर किल्ला या दोन महत्त्वपूर्ण विषयांवर आधारित प्रश्नमंजुषा आयोजित करण्यात आली, ज्यामुळे विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रमाशी आणि राष्ट्रीय वारसाशी असलेला संबंध अधिक दृढ झाला. कार्यक्रमाच्या समाप्तीपूर्वी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करून संविधानिक मूल्यांची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये जागृत करण्यात आली. या प्रेरणादायी उपक्रमात प्र. अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त, अधिकारी-कर्मचारी, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. मिरा भाईंदर महानगरपालिका पुढील काळातही "घर घर संविधान" उपक्रमांतर्गत विविध जनजागृती उपक्रम राबविणार असल्याचे मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद शर्मा (भा.प्र.से.) यांनी यावेळी स्पष्ट केले.